In Collabroration with Maanavata Hitay Social Foundation & Kamal Foundation
Under Registration Society Act, 12A, 80G, CSR1, Niti Aayog & DSC
मानवता कमल सेवा छत्र
वृद्धाश्रम
समाधानी आयुष्य जगण्याचे एकमेव ठिकाण
Dhanraj Singh Choudhary
7066883322
Under the Guidance of Kawade NGO Consultancy

# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे



✼ कराड (जि.सातारा) ✼ वर्ष - १ ले. ✼ अंक २७४ वा. ✼ गुरुवार दि.०८ मे २०२५ ✼ पृष्ठे ४ ✼ किंमत : १ रुपये ✼ RNI NO : MAHMAR/2024/86610

✼ Karad (Dis.Satara) ✼ Vol - 1 ✼ Ishue - 274 ✼ Thursday 08 May 2025 ✼ Page - 4 ✼ Price - 1 Rs. ✼ RNI NO : MAHMAR/2024/86610

# चीनच्या जे-३६ ला टक्कर देण्यासाठी जपानचे भारताला आवतण

## ६ व्या पिढीचे लढाऊ फायटर विकसित होणार?



बीजिंग : भारताला बुलेट ट्रेनचे तंत्रज्ञान पुरविणा-या जपानने चक्क सहाव्या पिढीचे जेट फायटर तयार करण्यासाठी भारताला निमंत्रण दिले आहे. हा आंतरराष्ट्रीय प्रस्ताव जपानने भारताला चीनचे जेट फायटर जे-३६ ला टक्कर देण्यासाठी दिला आहे. भारताने रशियाकडे सुखोईची लेटेस्ट पाचव्या पिढीच्या विमानासाठी विचारणा केली होती. परंतू देखभालीसह तंत्रज्ञान स्ट्रान्सफर करण्यास रशिया तयार नसल्याने हा प्रस्ताव बारळगला आहे.

६ व्या पिढीचे लढाऊ जेट विमान विकसित करण्याच्या आंतरराष्ट्रीय प्रयत्नात सामील होण्यासाठी जपानने भारताला आमंत्रण दिले आहे. या पावलामुळे इंडो-पॅसिफिक प्रदेशातील लष्करी गतिशीलता पुन्हा एकदा सक्रीय होणार असून चीनच्या संभाव्य वाढत्या कुरापतींना शह देण्यासाठीचे हे पाऊल असल्याचे म्हटले जात आहे. या आंतरराष्ट्रीय प्रयत्नांत भारत सामील होतो की नाही यावर अद्यापही भारताने कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

भारताकडे पाचव्या पिढीचेही फायटर जेट सध्या नाही. सध्या भारताकडे फ्रान्सने दिलेली राफेल विमाने आहेत. राफेल हे चौथ्या पिढीचे विमान आहे. परंतू रडारवर जराही न दिसणा-या पाचव्या पिढीच्या फायटर विमानांची भारतीय वायु सेनेला तातडीने गरज आहे. ग्लोबल कॉम्बॅट एअर प्रोग्रॅमअंतर्गत जपानने भारतात पुढे सहाव्या पिढीच्या विमानाला विकसित करण्याच्या आंतरराष्ट्रीय प्रयत्नात सामील होण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. जपान, युनायटेड किंगडम, भारत, इटली सारखे देश मिळून साल २०३५ पर्यंत सहाव्या पिढीचे फायटर जेट तयार करणार आहेत.

**तेजस: सिंगल इंजिन विमान रखडले**

भारताचे स्वदेशी लाईट कॉम्बॅट एअर क्राफ्ट हे तेजस हे सिंगल इंजिन विमान आहे. तेजसचा डबल इंजिनाचा प्रयोग देखील सुरू होणार आहे. तेजस फायटर विमानाला अमेरिकन जनरल इलेक्ट्रीक कंपनीने तंत्रज्ञान पुरविल्याने भारताचे तेजस विमानांचा ताफा वेगाने तयार झाला तर भारतीय वायू सेनेच्या जवानाच्या हवाई प्रशिक्षणाची सर्वात मोठी अडचण दूर होणार आहे. परंतू एचएएल मधून तेजस विमाने वेगाने तयार करण्यास विलंब झाला आहे.

### ध्वज विजयाचा उंच धरा.....

विश्वशांतीसाठी आपले भगवान गौतम बुद्ध....
निष्पापांच्या हत्येने मात्र सारे भारतीय क्रुद्ध...
राष्ट्रभक्तीच्या भावनेतूनच कर्तव्याची मनस्वी शुद्ध....
अहिंसा-जीवदयेचा मंत्र वर्धमान महावीर....
तरीही राक्षसांना गाडण्या सज्ज भारतीय शूरवीर...
करु आता धडावेगळे मानवतेच्या शत्रूंचे 'शीर'....
नापाक धरमवेड्यांना आता शिकूवू कायमचा धडा...
होण्या एकजूट सारे मतभेदाच्या भिंती तोडा...
शंका,संशयाचा याप्रसंगी तरी मनी नसावा 'तिढा'...
ज्ञानेश्वरांचे विश्वकल्याणी 'पसायदान'....
तुकोबाचे-'भले तर देऊ....'चे आम्हां वरदान....
अन्याय-अत्याचाराविरुद्ध घेऊ तळहाती 'प्राण'....
जिंकू किंवा मरु...माणुसकीच्या शत्रूसंगे युद्ध आपुले
सुरु..... भारत माता की जय!!
जय जवान! जय किसान
जय विज्ञान!

- प्रमोद तोडकर

# कराड नगरपालिकेत अधिकारी, नागरिकाची हाणामारी



कराड : कराड नगरपालिकेच्या नगररचना अधिक़ार्यास मारहाण केली असल्याची घटना नगरपालिकेत मंगळवारी सकाळी घडली. पालिकेत माहिती मागावयास गेलेल्या एका नागरिकाने बाचाबाचीनंतर अधिकार्यास धक्काबुक्की केली. त्यानंतर दोघांमध्ये तुंबळ हाणामारी झाली. यामुळे पालिकेत एकच खळबळ उडाली असून पालिकेच्या सर्व अधिकारी, कर्मचार्यांनी पोलिस ठाण्यात धाव घेतली व या घटनेचा निषेध नोंदवत दुपारनंतर कामबंद आंदोलन केले.

याबाबतची अधिक माहिती अशी की, कराड नगरपालिकेच्या नगररचना विभागातील सहाय्यक नगररचनाकार सचिन पवार यांना एका नागरिकाने बांधकाम विषयक माहिती मागितली. यावरून दोघांमध्ये बाचाबाची झाली. बाचाबाचीचे रूपांतर धक्काबुक्कीत होवून त्यानंतर दोघांमध्ये हाणामारी झाली. यावेळी पालिकेचे अधिकारी, कर्मचारी त्यावेळी उपस्थित होते. यानंतर पालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांनी पोलिस ठाण्यात धाव घेतली. यावेळी पोलिस ठाण्यात गर्दी झाली होती. मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांना माहिती समजल्यानंतर पोलिस ठाण्यात जावून पालिका कर्मचार्यांना शांत राहण्याच्या सूचना करत कोणताही निर्णय परस्पर घेवू नये, पोलिसांकडून योग्य कारवाई होईल अशा सूचना केल्या. शासकीय कर्मचार्यांना अशा प्रकारे मारहाण होणे योग्य नसून याचा कर्मचार्यांनी निषेध केला त्यानंतर दुपारनंतर सर्वच कर्मचार्यांनी कामबंद आंदोलन केले.

# रयत शिक्षण संस्थेच्या वतीने ९ मेला कर्मवीर पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन

सातारा : रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, आधुनिक शिक्षण भगीरथ पदभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा ६६ वा. पुण्यतिथी कार्यक्रम रयत शिक्षण संस्थेच्यावतीने शुक्रवार दि. ९ मेला कर्मवीर समाधी परिसर, सातारा या ठिकाणी आयोजित केला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष खा. शरदचंद्रजी पवार उपस्थित राहणार आहेत. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, ड. भगीरथ शिंदे, संस्थेचे संघटक, डॉ.अनिल पाटील यांच्या उपस्थितीत पुण्यतिथी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे औचित्य साधून रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक आणि भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी देणगी रूपाने विशेष योगदान देणाऱ्या मान्यवरांचा खा. शरद पवार यांच्या हस्ते सत्कार आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये खा. सौ सुप्रियाताई सुळे, थोर देणगीदार रामशेठ चांगू ठाकूर, सौ शकुंतला रामशेठ ठाकूर, श्रीमती मनीषा जाधव, जवाहरलाल नेहरू प्रशासन व सचिव राजेंद्र आप्पासाहेब पवार, प्रतापराव गोविंदराव पवार, ड. अशोक बोरा, डॉ. शिवाजीराव कदम, शुभांगी घरत, महेंद्र शेठ घरत, हणमंत शिवदास ठिगळे यांचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे. सातारा शहरातील नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन रयत शिक्षण संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी केले आहे.

# आपले सरकार सेवा केंद्रासाठी आर्थिक व्यवहार करु नयेत-उपजिल्हाधिकारी विक्रांत चव्हाण

सातारा : सातारा जिल्ह्यामध्ये आपले सरकार सेवा केंद्र जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांचेकडून वितरीत करणेत येणार आहेत. आपले सरकार सेवा केंद्र चालविणेसाठी इच्छुक असलेल्या ग्रामपंचायत व नगरपंचायतीच्या भौगोलिक क्षेत्रातील CSC-SPV कडे ऑनलाईन नोंदणीकृत CSC केंद्रचालकांकडून आणि CSC-SPV चे केंद्र मिळवण्यासाठी विहित केलेल्या अटी व शर्ती पूर्ण करत असलेल्या व्यक्तींकडून अर्ज मागविणेत आलेले आहेत.

आपले सरकार सेवा केंद्र नव्याने देणेबाबत कोणत्याही प्रकारची शासकीय फी स्वीकारली जात नसून संपूर्ण प्रक्रिया विनामूल्य असलेने, नागरिकांनी कोणत्याही अमिषाला बळी पडून त्रयस्थ व्यक्तीबरोबर आर्थिक व्यवहार करु नयेत. याकामासाठी कोणी पैशांची मागणी केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन माहे मार्च महिन्यातच विविध माध्यमांतून करुन नागरिकांना सतर्क राहणेबाबत कळविणेत आलेले आहे.

आपले सरकार सेवा केंद्र नव्याने देणेबाबत या कार्यालयामार्फत कोणत्याही प्रकारची शासकीय फी स्वीकारली जात नसून संपूर्ण प्रक्रिया विनामूल्य आहे. कोणी पैशांची मागणी केल्यास दूरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२१७५ वर तात्काळ संपर्क साधावा. असे आवाहन उपजिल्हाधिकारी महसूल विक्रांत चव्हाण यांनी केले आहे.

# महेश पाटील यांची बीएसएनएलच्या सल्लागार समितीवर सदस्य म्हणून निवड



मसूर : खा श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले कराड उत्तरचे युवा नेते कुलदीप अण्णा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली चिखली (ता. कराड) येथील ग्रामपंचायत उपसरपंच महेश पाटील यांची भारत संचार निगम लिमिटेड साताऱ्याच्या वतीने शशिकांत माळी, उपमंडल अधिकारी कराड यांनी टेलिफोन सल्लागार म्हणून जिल्हास्तरीय समिती सदस्यपदी कराड उत्तर मधून एकमेव महेश जाधव यांची निवड झाल्याचे नियुक्तीपत्र दिले.

महेश जाधव म्हणाले, कराड उत्तर युवा नेते कुलदीप (आण्णा) क्षिरसागर यांच्या शिफारशीनुसार निवड झाली असून त्यांनी जो विश्वास दाखवलेला आहे. तो निश्चितच या क्षेत्रात समाधानकारक काम करून पदाला न्याय देईन. भरीव कामगिरी करून बीएसएनएल बाबत जे लोकांच्या मनात गैरसमज आहेत.

लोकांना सोयी सुविधा मिळण्यामध्ये ज्या काही अडचणी असतील सोडवण्यामध्ये प्रयत्न राहील. कराड उत्तरमधून एकमेव दूरसंचार सल्लागार समिती सदस्य म्हणून मिळालेल्या संधीचं सोने करेल असा विश्वास व्यक्त केला. माजी ग्रामपंचायत सदस्य शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बंडोजीराव सावंत, कृष्णत सावंत, कैलास सावंत, अजय क्षिरसागर , शिवाजी पवार, अनिकेत माने, हणमंत पाटील, कुलदीप क्षिरसागर मित्रपरिवार उपस्थित होते.

# सेवानिवृत्ती ही एका नव्या पर्वाची सुरुवात : डॉ.सुरेश भोसले

## कृष्णा विश्व विद्यापीठात 'कृष्णा सेवागौरव' समारंभ उत्साहात



कराड : कृष्णा समूह हे एक कुटुंब आहे आणि या कुटुंबातील सदस्य सेवानिवृत्त झाले; तरी माजी कर्मचारी व कृष्णा समूहाचा स्नेह कायम आहे. सेवानिवृत्ती ही एका नव्या पर्वाची सुरुवात आहे. कृष्णा ही सेवाभावी संस्था आहे. या संस्थेच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याची सेवानिवृत्तीनंतरही काळजी घेतली जाईल, असे प्रतिपादन कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांनी केले. कृष्णा विश्व विद्यापीठात आयोजित 'कृष्णा सेवागौरव सेवानिवृत्ती' समारंभात ते बोलत होते.


याप्रसंगी व्यासपीठावर कुलसचिव डॉ. एम. व्ही. घोरपडे, कार्यकारी संचालक पी. डी. जॉन, उपकुलसचिव एस. ए. माशाळकर, कृष्णा हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. विजय कणसे, मेडिकल डमिनिस्ट्रेटर डॉ. आर. जी. नानिवडेकर, सहाय्यक कुलसचिव सौ. अस्मिता देशपांडे उपस्थित होते. यावेळी कृष्णा विश्व विद्यापीठ आणि कृष्णा हॉस्पिटलमध्ये दीर्घकाळ सेवा बजावणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना डॉ. भोसले यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ. भोसले पुढे म्हणाले, की कृष्णा समूहाच्या प्रगतीमध्ये कर्मचाऱ्यांचे योगदान नेहमीच महत्वपूर्ण राहिले आहे. संस्थेचे नाव मोठे होण्यामागे इथल्या कर्मचाऱ्यांचे अपार योगदान आहे.

त्यांच्या मेहनतीमुळे आज कृष्णा विद्यापीठाला व कृष्णा हॉस्पिटलला देशपातळीवर ओळखले जाते. सेवानिवृत्तीनंतरही कर्मचाऱ्यांनी आपले अनुभव समाजासाठी वापरावेत आणि सामाजिक कार्यात योगदान द्यावे. मनुष्यबळ विभागाचे व्यवस्थापक विक्रम शिंदे यांनी प्रास्तविक केले. डॉ. दिपाली जानकर यांनी सूत्रसंचालन केले. सहाय्यक व्यवस्थापक चेतन गोरे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला कृष्णा विद्यापीठाच्या दंतविज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ.शशिकिरण एन. डी., फिजिओथेरपी अधिष्ठाता डॉ.जी. वरदराजुलू, नर्सिंग अधिष्ठाता डॉ.वैशाली मोहिते, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ.गिरीश पठाडे, फार्मसी महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. शुभांगी शिंदे उपस्थित होते.

# सैनिकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचा दरबार



पुणे : जिल्हयातील सेवारत व सेवानिवृत्त सैनिक अधिकारी, माजी सैनिक, माजी सैनिक पत्नी, विधवा, वीरमाता, वीरपिता, वीरपत्नी व सेवारत सैनिकांसाठी १३ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली सैनिक दरबार आयोजित करण्यात येणार आहे.

तरी जिल्हयातील सेवारत व सेवानिवृत्त सैनिक अधिकारी, माजी सैनिक, माजी सैनिक पत्नी, विधवा, वीरमाता,वीरपिता, वीरपत्नी यांनी आपले अर्ज सैन्य नंवर, पद, नाव, पत्ता, मोबाईल नंबर व स्पष्ट विषयांसह तीन प्रतीमध्ये घेऊन अर्जदार यांनी आपले अर्ज ९ मे २०२५ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे येथे जमा करावेत व स्वतः १३ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे उपस्थित राहावे असे आवाहन लेफ्टनंट कर्नल हंगे स. दै. (नि.), जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, पुणे यांनी केले आहे.

## संपादकीय....

# उद्दिष्ट झाले साध्य...!

राज्यातील सरकारने आपल्या शंभर दिवसांच्या कार्याचे मूल्यमापन करून केलेल्या कामाचे सर्वेक्षण करून घेतले आणि त्याचा निकाल महाराष्ट्र दिनी जाहीर केला. यात शासनाच्या सर्व ४८ विभागांनी केलेल्या कार्याचा तपशील घेण्यात आला. एकूण ४८ विभागांपैकी १२ विभागांनी आपली १०० टक्के उद्दिष्ट पूर्तता केली आहे, तर आणखी १८ विभागांनी ८० टक्क्यांपेक्षा जास्त उद्दिष्ट्ये साध्य केली. पण मुख्यमंत्री स्वत: जे सामान्य प्रशासन विभाग पाहतात, त्यात त्यांना सरासरीपेक्षा कमी टक्केच मिळवता आले! इतकेच नव्हे, तर दोन्ही उपमुख्यमंत्री देखील त्यांच्यासोबत बरोबरीतच राहिले! म्हणजे इतर विभाग जरी कार्यतत्पर होत असले, तरी मुख्य व्यक्तीच्या खात्यात सरासरीपेक्षा कमी म्हणजे ये तो फेल हो गया रे!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहीम हाती घेतली. या मोहिमेचा उद्देश सर्व कार्यालये ऑनलाइन स्वच्छ, नागरिकांच्या तक्रारीचे तत्काळ निवारण करणे, झिरो पेन्डेन्सी आदी कार्यक्रमांचा त्यामध्ये समावेश होता. १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाचे (ऑफीस इम्प्रोव्हमेंट प्रोग्राम) भारतीय गुणवत्ता परिषद (क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया)तर्फे अंतिम मूल्यमापन करण्यात आले. भाजपचे तीन विभाग टॉप पाचमध्ये आहेत. पहिल्या क्रमांकावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या असलेल्या मंत्री आदिती तटकरेंचे महिला व बालविकास खाते आघाडीवर आहे, तर सार्वजनिक बांधकाम विभाग दुसऱ्या क्रमांकावर आहे. याबाबतची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाज माध्यमावर दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे सध्या गृहखाते आहे. त्यांच्या गृहखात्याने चांगली कामगिरी केली आहे. ते दुसऱ्या क्रमांकावर असून, त्यांनी ३१ उद्दिष्ट्ये पूर्ण केली आहेत, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास आणि गृहनिर्माण खाते आहे. यातील नगरविकास खात्यातील ३४ उद्दिष्टांपैकी २९ उद्दिष्ट्ये एकनाथ शिंदेंनी पूर्ण केली आहेत. तसेच गृहनिर्माण खात्यातील ६६ पैकी ४५ उद्दिष्ट्ये पूर्ण झाली आहेत. तसेच अजित पवारांकडे अर्थ आणि राज्य उत्पादन शुल्क हे दोन विभाग आहेत. यात राज्य उत्पादन शुल्कातील ६ पैकी ५ उद्दिष्ट्ये पूर्ण झाली आहेत.

राज्यात नवीन महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर शासनाच्या सर्व ४८ विभागांनी १०० दिवसांचा धोरणात्मक बाबींचा कार्यक्रम हाती घेऊन महत्त्वाची नवीन धोरणे, दूरगामी निर्णय व लोकाभिमुख उपक्रमांची आखणी सुरू केली. गेल्या १०० दिवसांत या सर्व विभागांनी निश्चित केलेल्या ९०२ धोरणात्मक उद्दिष्टांपैकी ७०६ उद्दिष्ट्ये (७८ टक्के) पूर्णतः साध्य केली आहेत, तर उर्वरित १९६ उद्दिष्ट्ये पूर्ण होईपर्यंत संबंधित विभाग आपले काम चालूच ठेवतील. असा संदेश समाज माध्यमावर जारी करून मुख्यमंत्री महोदयांनी 'गिरे तो भी टांग उपर' या म्हणीची आठवण करून दिली. आपल्या संदेशात मुख्यमंत्री म्हणतात, एकूण ४८ विभागांपैकी १२ विभागांनी आपली १०० टक्के उद्दिष्टपूर्तता केली आहे, तर आणखी १८ विभागांनी ८० टक्क्यांपेक्षा जास्त उद्दिष्ट्ये साध्य केली आहेत. आपल्या ४८ विभागांपैकी केवळ १२ विभागांनी १०० टक्के, तर १८ विभागांनी ८० टक्के उद्दिष्ट पूर्ण केली. याचा अर्थ असा की, उरलेल्या १८ विभागांनी काहीही केले नाही किंवा ते आपली उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यात अपयशी ठरले. त्यातही ४८ विभागांतील केवळ १२च विभाग शंभर टक्के काम करू शकले, याचा अर्थ हे सरकार सरासरीही गाठू शकले नाही, हे सत्य स्वतः मुख्यमंत्र्यांनीच जाहीर केले आणि आपण फेल झालो हे मान्य केले. या अहवालात महिला व बालविकास विभाग, सार्वजनिक बांधकाम, कृषी, ग्रामविकास आणि परिवहन विभाग यांनी सर्वाधिक गुण मिळवत आघाडी घेतली. याशिवाय सर्वोत्तम महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्त आणि विभागीय आयुक्तांचीही यादी प्रसिद्ध करण्यात आली. राज्य सरकारच्या कामगिरीच्या तपशीलवार अहवालानुसार ज्या विभागांनी उत्कृष्ट कामगिरी करत टॉप पाच स्थान पटकावले त्यात महिला व बाल विकास विभाग – ८० टक्के, सार्वजनिक बांधकाम विभाग – ७७.९५ टक्के, कृषी विभाग – ६६.१५ टक्के, ग्रामविकास विभाग – ६३.८५ टक्के, परिवहन व बंदरे विभाग – ६१.२८ टक्के. ४८ पैकी १२ विभागांनी १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केल्याचे फडणवीसांनी नमूद केले, तर १८ विभागांनी ८० टक्क्यांपेक्षा अधिक कामगिरी बजावली. रिपोर्ट कार्डमध्ये केवळ मंत्री नव्हे, तर विविध क्षेत्रांतील वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची कामगिरीही नमूद करण्यात आली आहे.

# उंब्रजकरांच्या नशिबी खड्ड्यांचा वनवास

उंब्रज : उंब्रज (ता.कराड) येथील पाटण तिकाटण्यातील बोगद्यात अक्षरशः खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे.रोज हजारो उंब्रजकरांना या खड्ड्यांमधून प्रवास करावा लागत आहे.



उंब्रजकरांच्या नशिबी असलेला खड्ड्यांचा वनवास नेमका संपणार तरी केव्हा? असा प्रश्न उपस्थित झाल्यास आश्चर्य वाटायला नको. या ठिकाणाहून प्रवास करताना वाहन धारकांना कसरतीचा सामना करावा लागत आहे.सदर बोगद्यात विजेची सोय नसल्यामुळे रात्री अंधारात एखाद्या दुचाकीस्वाराचा पडलेल्या महाकाय खड्ड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या ठिकाणी खड्ड्यात रस्ता आहे की रस्त्यात खड्डे आहेत हेच कळेनासे झाले आहे. दरम्यान,हे खड्डे चुकवण्याच्या नादात अनेक दुचाकी,चारचाकीस्वार बोगद्यात अगदी मधोमध गाडी चालवतात त्यामुळे भविष्यात गंभीर अपघात,वादविवाद होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे संबंधित विभागाने बोगद्यात पडलेले महाकाय खड्डे पावसाळ्यापूर्वी बुजवून वाहनधारकांना दिलासा द्यावा अशी मागणी वाहनधारकांमधून होत आहे.

**मंत्र्यांचे दौरे अन् यंत्रणेची लगबग**

**एकीकडे ज्या भागात मंत्र्यांचे दौरे असतात त्या ठिकाणी अगदी रातोरात यंत्रणा कामाला लावून रस्त्यावरील खड्ड्यांची डागडुजी केली जाते.तर दुसरीकडे सर्वसामान्य जनतेच्या नशिबी मात्र खड्ड्यांचा वनवास असतो.ही खूप मोठी शोकांतिका आहे.**

# श्री दत्त संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात

शिराळा : श्री दत्त नागरी पत संस्था उरूण इस्लामपूर या संस्थेचे कर्मचारी स्नेहसमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. दिवसभर चाललेल्या कार्यक्रमात कर्मचारी,अधिकारी धनवर्धीनी प्रतिनिधी, संचालकांनी पदाची झुल बाजुला ठेऊन दत्त हा एक परीवार आहे या भावनेने आपली कला सादर केली. गेली अनेक वर्ष कामगार दिनाचे औचित्य साधून सर्व कर्मचारी व धनवर्धीनी प्रतिनिधी यांना कामातून विरंगुळा मिळावा या हेतुने संचालक मंडळाने हा उपक्रम सुरू केला आहे. हा कार्यक्रम दिवसभर असतो. शासकीय वेळेनुसार निवृत्त शिक्षक एकनाथ पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



यावेळी झालेल्या कार्यक्रमात कार्यलक्षी संचालक महेश कबाडे यांनी स्वागत व प्रास्ताविक करून दिवसभराच्या कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. संस्थापक प्राचार्य डॉ.पी.बी. कुलकर्णी यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे एकनाथ पवार यांचा यथोचित सत्कार केला.यावेळी जाधव व प्राचार्य डॉ.कुलकर्णी यांनी सर्व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.त्यानंतर स्नेहसंमेलनाची सुरवात झाली.

संचालक सुभाष खिलारे यांनी सर्पाविषयी माहिती दिली,कार्यलक्षी संचालक महेश कबाडे,वसुली अधिकारी शशिकांत पिसे अबरार मोमिन यांनी गीत गायन केले. कर्मचारी प्रदीप ताटे यांनी गझल म्हटले तर सौ. श्वेता जाधव,सौ.साक्षी वाळवेकर संजय विभुते यांनी कवीत सादर केल्या.शिराळा शाखेतील जगदीश गायकवाड यांनी विविध विनोद सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी गाण्याच्या भेंड्या, संगीत खुर्ची असे विविध खेळ खेळण्यात आले. संस्थेचे चेअरमन प्रा.डॉ.श्रीकांत चव्हाण हे अध्यामिक वृत्तीचे व्यक्तिमत्व आहे त्यांनी भजन व धार्मिक गाणी सादर केली त्यांनी तबला साथ कर्मचारी संकेत सुतार दिली.सई कुलकर्णी यांनी संस्थेविषयी काही प्रश्नोत्तरे विचारली यावेळी व्हा.चेअरमन बी. टी. निकम, इस्लामपूर शाखा प्रमुख दिलीप फल्ले,संचालिका सौ.सुखदा महाजन,सोमाजी कोळेकर,सुभाष खिलारे, सहा. कार्यलक्षी संचालक संजय विभूती अधिकारी विजय पाटील, नितीन सपाटे इत्यादी उपस्थित होते. सूत्रसंचलन श्रद्धा शेटे यांनी केले व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेश कबाडे,संजय विभूते व टिम परिश्रम केले.

# मान्सुन पूर्व तयारीचे आराखडे २० मे पूर्वी सादर करा–जिल्हाधिकारी संतोष पाटील

सातारा : हवामान खात्याने यंदा सरासरीपेक्षा चांगल्या पाऊसमानाचे अंदाज वर्तवले आहेत. आपत्ती व्यवस्थापनाच्यादृष्टीने सर्व यंत्रणांनी व विभागांनी तालुका व गावपातळीवर मान्सुन पूर्व तयारीचा आढावा घेऊन आराखडे २० मे पूर्वी सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सातारा जिल्हा मान्सूनपूर्व तयारी व उपायोजनेसंदर्भात आढावा बैठक झाली. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, उपजिल्हाधिकारी (महसूल) विक्रांत चव्हाण, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी देविदास ताम्हाणे यांच्यासह जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, धरण विभागांचे कार्यकारी अभियंत्यांसह आदी कार्यकारी यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते.

जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे संभाव्य पूर परिस्थिती उद्भवल्यास, अतिवृष्टीमुळे दरडी कोसळून मनुष्य व पशू जिवीतहानी होऊ नये यासाठी सर्वच विभागांनी सतर्क रहावे, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, मागील काही वर्षात पडलेल्या सरासरी पर्ज्यन्यमानाची, पूर संवेदशील गावांची व पूर परिस्थीतीची, धरणांतील पाण्याची आवक, सोडलेल्या पाण्याचा विसर्ग, दरड प्रवण ठिकाणांची माहिती घेऊन करण्यात येणा–या उपायोजनांचा मार्गदर्शक आराखडा सादर करावा. मंडळनिहाय पर्जन्यमापक यंत्रे सुस्थितीत असल्याची खात्री करावी. शोध व बचाव कार्याच्या साहित्याची चाचणी करावी. गावस्तरावर पुरविण्यात आलेले साहित्य उत्तम स्थितीत असल्याचीही खात्री करावी.

पावसाळ्यापूर्वी गटारी व नाल्यांची साफसफाई मोहीम राबवा. विद्युत विभागाने या काळात वीज पुरवठा खंडीत होऊ नये म्हणून अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या मान्सुनपूर्वी कापून घ्याव्यात. विद्युत डीपींची देखभाल दुरुस्ती करुन घ्याव्यात. भूस्खलन व दरडप्रवणाची शक्यता असणाऱ्या गावांमध्ये बचावाची प्रशिक्षणे व जनजागृती कार्यक्रम घ्यावेत. वारंवार पडझड होणाऱ्या घरांची तसेच धोकादायक इमारतीची माहिती घेऊन संबंधित घरमालकांना सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी सुचना द्याव्यात. शहर व गावातील विशेषत: हायवे लगतच्या मोठ्या होर्डिंग्जचे स्ट्रॅक्चरल ऑडीट करावे. विनापरवानगी होर्डींग तात्काळ काढून टाकावीत. पावसामुळे संपर्क तुटण्याची शक्यता असणाऱ्या गावांमध्ये अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तुंचा व औषधांचा पुरवठा करावा. दरडी कोसळून रस्ते वाहतूक विस्कळीत होऊ नये यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आवश्यक उपाय योजना तयार ठेवाव्यात.

पूर परिस्थिती व दरडी कोसळण्याचा धोका निर्माण झाल्यास बाधितकुटूंबाना तात्पुरत्या स्थलांतरणासाठी उपलब्ध असणारे शेड, निवारा ठिकाणांची माहिती घेऊन स्वच्छता व डागडूजी करावी, संभाव्य आपत्ती निवारणासाठी सर्व यंत्रणांनी आवश्यक तयारी ठेवावी व तयारीचे आराखडे सादर करावेत,अशा सुचना जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी दिल्या.

# एस.एम.एस.इंग्लिश स्कूलमध्ये रंगला पदवीदान समारंभ

कराड : शिक्षण मंडळ कराड संचालित एस.एम.एस इंग्लिश मिडीयम स्कूल व स्व.रुक्मिणी रामबिलास लाहोटी इंटरनॅशनल स्कूलमध्ये पूर्व प्राथमिक गटातून प्राथमिक गटामध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ नुकताच संपन्न झाला.



आपल्या पाल्यास पदवीदान पोशाखात पाहून पालक व उपस्थित सर्व भारावून गेले.प्रसंगी शिक्षण मंडळ,कराडचे चेअरमन बाळासाहेब कुलकर्णी,व्हाईस चेअरमन अनघा परांडकर,सचिव चंद्रशेखर देशपांडे,एस.एम.एस इंग्लिश मिडीयम स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रुती रेमणे,प्राथमिक गटाच्या मुख्याध्यापिका स्नेहल वाळिंबे, स्व.रुक्मिणी रामबिलास लाहोटी इंटरनॅशनल स्कूलच्या मुख्याध्यापिका गौरी बानगुडे,पालक,विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

शैक्षणिक वर्षाच्या शेवटी पूर्व प्राथमिक गटातून विद्यार्थी प्राथमिक गटांमध्ये प्रविष्ट होतात.शिक्षण मंडळ,कराडच्या पदाधिकाऱ्यांच्या संकल्पनेतून छोट्या विद्यार्थ्यांना पदवीदान समारंभाचा थेट अनुभव देण्यासाठी सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

छोटे स्नातक विद्यार्थी विशेष पोशाख व टोपी परिधान करून व्यासपीठावर आले व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.अध्ययन अध्यापन प्रक्रियेत शिक्षक,पालक व शैक्षणिक संस्था यांच्या भूमिका कशा पद्धतीने असायला हव्यात तसेच विद्यार्थ्यांमधील असलेल्या विशेष गुणांना प्राधान्य दिले तर विद्यार्थ्यांची शिक्षणामध्ये रुची निर्माण होऊ शकते यासाठी हा उपक्रम प्रशंसनीय आहे असे प्रतिपादन प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण मंडळ कराडच्या व्हाईस चेअरमन अनघा परांडकर यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रुती रेमणे यांनी केले.

# आता 'बीएसएफ'ची बारी

नवी दिल्ली : पहलगाम हल्ल्याचा भारताने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून बदला घेतला आहे. भारताने या मोहिमेच्या अंतर्गत पाकव्याप्त काश्मीर म्हणजेच पीओके आणि पाकिस्तान येथील काही दहशतवादी तळांवर हल्ले केले आहेत.

एकूण ९ ठिकाणी हे हल्ले करण्यात आले आहेत. दरम्यान, भारताच्या या हल्ल्यानंतर पाकिस्तानमध्ये एकच खळबळ उडाली आहे असे असतानाच आता दिल्लीमध्ये पुन्हा एकदा घडामोडींना वेग आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बीएसएफचे महासंचालक यांच्यात दिल्लीत महत्त्वाची बैठक होत आहे.

ऑपरेशन सिंदूरनंतर दिल्लीत मोठ्या घडामोडी घडत आहेत. दिल्लीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अनेक महत्त्वाच्या व्यक्तींसोबत बैठका घेत आहेत. भारताने मध्यरात्री पाकिस्तानवर केलेल्या हल्ल्यानंतर भारताच्या सर्वच यंत्रणा हायअलर्टवर आहेत. भारताचे वायूदल, भूदल आणि नौदल सज्ज आणि दक्ष झाले आहे. भारताच्या हल्ल्यानंतर पाकिस्तान चवताळला असून सीमाभागात गोळीबार केला जात आहे.

# भावाचे..देवाचे अनं गावाचे

भावाचं..देवाचं अनं गावाचं कधी खाऊ नये असे म्हटले जाते. ग्रामीण भागातील जुन्या जाणत्या,वृद्धत्वाकडे झुकलेल्या ज्येष्ठांच्या तोंडातून येणारे हे बोली भाषेतील प्रचलित शब्द आहेत.या शब्दांचा अर्थ ही खूप प्रगाढ आहे. याचे खोलवर विश्लेषण केल्यानंतर यातील खरे मर्म लक्षात येते.

एकाच आईच्या गर्भातून जन्म घेतलेला सख्खा भाऊ आपला पाठीराखा असतो. तर देव म्हणजे आपल्या आयुष्यातील सर्वात पवित्र असे श्रद्धास्थान असते जे आपल्या धर्माच्या धार्मिक रूढी व परंपरांना, संस्कृतीला खऱ्या अर्थाने अधिक बळकट करून जीवनाला सार्थकी करण्याबरोबरच मोक्ष प्राप्तीकडे नेण्याचे काम करणारी अदृश्य शक्ती असते अनं गाव म्हणजे आपले उगमस्थान,कुटुंब तसेच पूर्वज यांचे अस्तित्व जिवंत ठेवणारी अस्मिता असते. परंतु,अगदी पूर्वीपासून भाऊ,देव अनं गाव या तिन्ही गोष्टींवर घाला घालण्याचे काम भामट्या, पाखंडी प्रवृत्तींकडून सुरू आहे. एकाच आईच्या गर्भातून आलेल्या सख्या भावाला पराकोटीचा पाखंडीपणा करून त्याच्या बापरोटीतून,हिश्शातून बेदखल करण्याचे,वंचित ठेवण्याचे पातक करणारे महाभामटे पाखंडेश्वर समाजात सर्वत्र आढळून येतात. तर देवस्थानची मालमत्ता तसेच ट्रस्ट,मंदिरे यांच्या माध्यमातून दानपेटीमध्ये जमा होणारी लाखो रुपयांची देणगीरुपी माया हडप करून आर्थिक घोटाळे करणाऱ्या घोटाळेबाजांची संख्या काही कमी नाही.अलीकडील काळात देवस्थानचे ट्रस्टी, व्यवस्थापक,पुजारी यांच्याकडून बऱ्याच देवस्थानांचे आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे आपण ऐकतो,वाचतो,पाहतो. देवस्थानांच्या आर्थिक गैरव्यवहारांची अशी अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित देखील आहेत. हल्ली गावगाड्यातील पुढाऱ्यांच्या गावगुंडी राजकारणाचा विचार करता गावाचा सेवक असल्याचे भासवून प्रत्यक्षात गावाचा मालक असल्यासारखे आचरण करीत गावच्या सार्वजनिक मालमत्तेत अतिक्रमण करणे, मनमानी पद्धतीने आपल्याला हवे तसे निर्णय घेऊन गावच्या मालमत्तेतील मालमलिदा हडपणे.गावचे नेतृत्व करणे म्हणजे हुकूमत गाजवणे नाही तर स्वतः जबाबदारी स्वीकारून, लोकांना योग्य दिशा दाखवून त्यांना बरोबर घेऊन त्यांचीही प्रगती करणे होय.या अलिखित नैतिकमुल्याच्या नेमके उलट वर्तन करणारे, आपल्याकडे असलेल्या सत्तेचा दुरुपयोग करून स्वतःच्या तुंबड्या भरणारे स्वैराचारी गावकारभारी गावोगावी उदंड जाहले आहेत. समाजात सर्वत्र अक्षरशः बजबजपुरी माजली आहे. परंतु, तो सर्वकाही पाहतोय. निदान त्याला तरी भ्या. कारण त्याच्या दरबारात वेळेनुसार चांगल्या वाईट कर्माचा हिशेब हा ठरलेलाच असतो.त्यातून कोणाचीही सुटका नाही. त्यामुळे अंगातील दुर्गुणांना कायमस्वरूपी तिलांजली देऊन सद्गुण अंगीकारा.सत्य मार्गावर चाला. कुकर्म करून दीनदुबळ्यांचे शिव्याशाप घेण्यापेक्षा सदकर्म करून आशीर्वाद घ्या. सामाजिक बांधिलकी ठेवून समाजासाठी आपल्या कुवतीनुसार काहीतरी करा. नाथांचे नाथ व्हा, सदाचारी बना, आनंदी,सकारात्मक रहा, फळाची अपेक्षा न ठेवता आपले कर्म प्रामाणिकपणे करत रहा. कोणाविषयी द्वेष बाळगू नका, राग,लोभ,द्वेष,मत्सर या षडरिपूंना चार हात लांब ठेवून आरोग्यदायी जीवन जगा.. एकूण काय तर जगा आणि जगू द्या. कारण तुम्हीच आहात तुमच्या जीवनाचे शिल्पकार..!



**शब्दांकन–पत्रकार रघुनाथ थोरात,** मु कळंत्रेवाडी पो उंब्रज – मोबाईल–९०२८७६६०४२

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन – ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा – ४१५११० येथून प्रकाशित केले. ※ संपादक – गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जनतेसमोर येणार-संग्रहालयाचे काम अंतिम टप्प्यात

## प्रधानमंत्री यांच्या हस्ते उद्घाटन होणार

नवी दिल्ली : छत्रपती शिवाजी महाराज मेमोरियल राष्ट्रीय समितीच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा दैदिप्यमान इतिहास डोळे दिपवणाऱ्या संग्रहालयाच्या माध्यमातून जनतेसमोर उभा करण्यात येत आहे. या संग्रहालयाचे काम अंतिम टप्प्यात असून या संग्रहालयाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होईल, अशी माहिती समितीचे महासचिव कर्नल मोहन कात्तीकर (सेवानिवृत्त), मिलिंद पाटील यांनी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी गार्डियन मीडिया आणि इंटरटेनमेंट चे संचालक संजय दाबके हे ही उपस्थित होते. श्री दाबके



यांच्या माध्यमातून अत्याधुनिक अद्यावत असे संग्रहालय मूर्त रूपात उभे राहत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज मेमोरियल राष्ट्रीय समिती ही दिल्लीतील इन्स्टिट्यूशनल एरिया कुतुब एन्क्लेव्ह या ठिकाणी आहे. या इमारतीचे उद्घाटन तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते झाले होते. या ठिकाणी जागतिक दर्जाचे छत्रपती शिवाजी महाराजांचे ऐतिहासिक संग्रहालय राजधानी दिल्लीत असावे असा मानस समितीचा होता. त्याप्रमाणे वर्ष २०२० पासून यावर काम सुरू आहे. अशी माहिती, श्री कात्तीकर यांनी यावेळी दिली. उत्तर भारतामध्ये छत्रपती (पान ४ वर)

# कराड बार असोसिएशन अध्यक्ष ॲड.दीपक थोरात यांचा सत्कार



**कराड : ॲड. दीपक थोरात यांची नुकतीच कराड बार असोसिएशन अध्यक्षपदी निवड झाली याबद्दल त्यांचे स्वराज्यरक्षक श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज स्मारक समितीच्या वतीने सत्कार व अभिनंदन करण्यात आले. ॲड. दीपक थोरात स्मारक समितीचे विश्वस्त आहेत, सत्कार करताना स्मारक समितीचे श्री रणजीत पाटील नाना प्रताप इंगवले, सुनील शिंदे, चंद्रकांत पाटील,रोहित पंडीत, सुहास गोतपागर, समीर पाटील वाठारकर, तेजस माने,प्रशांत बोरकडे,सर्फराज बागवान.**

# उद्योगऊर्जा नॅशनल अवॉर्ड ऑफ एक्सलन्स पुरस्काराने सन्मानित

मुंबई(गुरुनाथ तिरपणकर) : आर्मी कन्या अंजली साखरे आणि संतोष साखरे संचालित या प्रतिष्ठित संस्थेच्या वतीने उद्योगऊर्जा या संस्थेचा नुकताच नॅशनल अवॉर्ड ऑफ एक्सलन्स देऊन गौरव करण्यात आला. MSME उद्योजकांच्या विकासासाठी आणि नेटवर्किंगचे भक्कम व्यासपीठ उभे करण्यासाठी गेल्या सहा वर्षांहून अधिक काळ केलेल्या समर्पित समर्पित कार्याचा हा यथोचित सन्मान झाला आहे. हा गौरव सोहळा भायखळा येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात अत्यंत उत्साहात पार पडला. विशेष म्हणजे हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी उद्योगऊर्जा संस्थेच्या सक्रिय, तेजस्वी आणि प्रेरणादायी महिला सदस्यांनी व्यासपीठ गाठून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हा बहुमान स्वीकारला. हा केवळ पुरस्कार नाही तर महिलाशक्तीच्या उद्योग सहभागाचे, नेतृत्वाचे आणि कर्तृत्वाचे प्रतीक आहे.

या कार्यक्रमाचे नेतृत्व संस्थेच्या अनुभवी मार्गदर्शक चित्रा राऊत आणि सुसंवादक अरुण सोनवणे यांनी प्रभावीपणे पार पाडले. त्यांच्यासोबत व्यासपीठावर आरती चोरगे, आसावरी नगरदेवळेकर, विजयशिला सावंत - तांबे, सुषमा शिर्के, शमिका मुणगेकर, छाया गचके, मीना



पपनोई, मृणाल भट, लता शिरसाट, उल्का तेंडुलकर, मिनल दिल्लीकर या कार्यक्षम महिला उद्योजकांची उपस्थिती सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली.उद्योगऊर्जा संस्थेने गेल्या ६ वर्षांत ऑनलाईन व ऑफलाईन माध्यमातून शेकडो मिटिंग्स, ट्रेनिंग्स आणि नेटवर्किंग कार्यक्रमांचे आयोजन करून हजारो MSME उद्योजकांना मार्गदर्शन, संधी आणि ऊर्जा दिली. या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित म्हणजे एकत्रित १०.५० कोटींचा व्यवसाय या यशामागे फक्त उपक्रम नाहीत, तर आहे एक ध्येय, एक जिद्द, एक बांधिलकी, आणि एक विचार आहे आणि तो म्हणजे प्रत्येक उद्योजक, कोट्याधीश उद्योजक व्हावा.

या निमित्ताने उद्योगऊर्जा संस्थेचे प्रमुख संघटक आणि प्रेरणास्त्रोत ब्रँडबॉन्ड निलेश यांनी MSME उद्योजकांना आवाहन केले की, नेटवर्किंग माध्यमातून आपल्या ओळखी वाढवा, प्रशिक्षण घ्या, नेतृत्वगुण विकसित करा, आपला व्यवसाय भक्कम करा व त्या माध्यमातून एकंदरच आपल्या उज्वल भवितव्यासाठी अधिकाधिक चडचए व्यावसायिकांनी संस्थेमध्ये सहभागी होऊन आपला व संस्थेचा सर्वांगीण विकास करावा.

चला भेटूया, परस्परांना ऊर्जा देऊया असे म्हणत तब्बल साडेसहा वर्षे लहान-मध्यम व्यवसायिकांसाठी एक मजबूत संघटन उभारणाऱ्या आणि सध्या संपुर्ण महाराष्ट्रात गर्जा महाराष्ट्र ऊर्जा महाराष्ट्र या स्फूर्तिदायक घोषणेच्या साथीने एक उद्योजक, कोटी उद्योजक म्हणत प्रत्येक उद्योजक, कोट्याधीश उद्योजक व्हावा.

यासाठी ऑनलाईन-ऑफलाईन सतत प्रयत्नशील असणारी उद्योगऊर्जा संस्था सध्या आपला ७ वा सप्तरंगी वर्धापनदिन उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्याची तयारी करत आहे. उद्योजकतेला ऊर्जा देणारी उद्योगऊर्जा चळवळ आता प्रत्येक व्यावसायिकाच्या सहभागाची वाट पाहते आहे.

# महाराष्ट्रातील सौर ऊर्जेचे पहिले सरकारी कार्यालय साताऱ्यात

सातारा(अजित जगताप): छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या सातारा शहराचा ऐतिहासिक वारसा आजही जतन केला जातो. साताऱ्यातील बस स्थानक शेजारील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात सध्या सौर ऊर्जावर चालणारे उपकरण बसविण्यात आले आहे. दिनांक १२ मे रोजी बुद्ध जयंतीच्या निमित्त या सौर ऊर्जा उपकरणाचे उद्धाघाटन होत असल्याने स्वयंप्रकाशित व्हा हा संदेश दिला जाणार असा अंदाज आहे.

सातारा बस स्थानक शेजारी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालयामध्ये गेल्या वर्षी प्रतापगड येथील शिवप्रताप इतिहास घडवणाऱ्या वाघ नखे थेट इंग्लंड मधून राणी एलिझाबेथ म्युझियम येथून मोठ्या पोलीस बंदोबस्तात साताऱ्यात आगमन झाले. तेव्हापासून हे संग्रहालय सर्व शिवप्रेमींसाठी तीर्थक्षेत्र बनले होते. या वस्तू संग्रहालयाचे अधीक्षक श्री प्रवीण शिंदे व श्री गायकवाड तसेच इतर कर्मचाऱ्यांनी वाघ नखे आगमन ते साताऱ्यातून पुन्हा सुरक्षितरीत्या इतर ठिकाणी पाठवण्यासाठी परिश्रम घेतले होते. सुरक्षेच्या कारणामुळे डोळ्यात तेल घालून जबाबदारी पार पाडली होती. आता या ठिकाणी शिवकालीन महाराष्ट्रातील बारा किल्ल्यांची प्रतिकृती तयार करण्यात आली आहे . लवकरच शिवप्रेमींसाठी ती खुली करण्यात येणार आहे. त्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयामध्ये



सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाच्या वतीने २४० वॅट उत्पादन करणारी सौर ऊर्जा पॅनल टाकण्यात आलेले आहे.९३ सौर ऊर्जा पॅनल मधून ५८५ वॅट वीज उत्पादन होणार आहे. याची लांबी अडीचशे फूट असून त्यामुळे स्लॅबची संरक्षण झालेले आहे.

शांततेचा संदेश देणाऱ्या भगवान गौतम बुद्ध जयंतीच्या दिवशी सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित होईल. अशी अपेक्षा आहे. वेध महिला बचत गट विपणन महामंडळाच्या वतीने पंधरा दिवसापासून पन्नास के.वी. सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीचे काम झाले आहे. यामुळे दीड लाख रुपये ची बचत होणार आहे. जशा पद्धतीने शासकीय कार्यालयात झिरो पेंडेन्सी राबवण्यात येते त्या पद्धतीने आता शून्य वीज देयक होणार असल्याने ती एक क्रांती ठरली आहे.

या पॅनलची २५ वर्ष आयुष्यमान आहे. पुरातन विभागाच्या निधीतून हे काम झाले असल्याने ते उत्कृष्ट झालेले आहे. यासाठी पुरातन विभागाचे संचालक व संबंधित तांत्रिक विभागाचे अधिकारी वर्ग यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. याचबरोबर छत्रपती शिवाजी वस्तू संग्रहालयामध्ये वस्त्र विभाग, संक्रम विभाग, चित्र विभाग पूर्ण झाले असून युनेस्कोने मान्यता दिलेल्या बारा किल्ल्यांची प्रतिकृती ही तयार होऊन ती खुली होणार आहे. त्यापूर्वी फ्रान्स येथे बैठक होईल. अशी माहिती घेण्यात आलेली आहे.

महाराष्ट्रातील शासकीय कार्यामध्ये सर्वप्रथम सातारा जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी वस्तू संग्रहालयात सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी केल्याबद्दल अनेक मान्यवरांनी संग्रहालय व पुरातन विभागाचे कौतुक केले आहे. सध्या तापमान वाढीस लागलेले असून ते सौर ऊर्जेसाठी अनुकूल आहे त्याचबरोबर सातारा जिल्ह्यातील सौर ऊर्जा प्रकल्पासाठी पोषक वातावरण असल्याचे तांत्रिक माहिती मिळाली आहे.

# कामगारांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

शिराळा : मोरणाराज कामगार असोसिएशनच्यावतीने कामगार दिनानिमित्त स्नेह मेळावा व सन्मान सोहळा व्यापारी असोशिएशन येथे संपन्न झाला.यावेळी कामगारांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर ही घेण्यात आले.त्यास चांगला प्रतिसाद मिळाला. असोसिएशनच्यावतीने समाजातील विविध क्षेत्रातून गोरगरीब लोकांसाठी शैक्षणिक, सामाजिक,वैद्यकीय बांधकाम, पत्रकारिता, उद्योग व आरोग्य यांचे माध्यमातून उपेक्षितांच्या विविध प्रश्नांवर प्रामाणिक व उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

यावेळी आमदार सत्यजित देशमुख यांच्या हस्तेआदर्श शिक्षक प्रा.डॉ. तानाजी हवलदार, आदर्श वैद्यकीय सेवा डॉ.कृष्णा जाधव,आदर्श उद्योजक सूर्यकांत जाधव,आदर्श पत्रकार शिवाजीराव चौगले,आदर्श आरोग्य सेवक विजय




कांबळे,आदर्श अभियंता रोहन शिंदे यांना गौरविण्यात आले. स्वराली चौगुले व शब्दाली चौगुले ह्या अभियंता झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार आमदार सत्यजित देशमुख यांच्या हस्ते यावेळी करण्यात आला.

यावेळी आमदार देशमुख म्हणाले,मारुती रोकडे यांनी कोणती ही राजकीय पार्श्वभूमी नसताना कामगारांसाठी सामाजिक दृष्टिकोनातून केलेले संघटन कौतुकास्पद आहे. कामगार हाच खरा गौरवशाली महाराष्ट्राचा कणा आहे.बांधकाम कामगारांच्या मुलांना तात्काळ शिष्यवृत्ती देण्यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत.३ वर्षे नोंदणी असणाऱ्या कामगारांना अटल घरकुलचा लाभ तात्काळ स्वयं घोषणा पत्रावर मिळावा यासाठी पाठपुरावा सुरु आहे. ही सामाजिक चळवळ मारुती रोकडे यांनी पुढे घेऊन जावे.

वाळवा शिराळा वनश्री को-ऑपरेटिव्ह संघाचे अध्यक्ष सम्राट महाडिक म्हणाले,कामगारांची संघटना व संघटन महत्वचे आहे.या जोरावर आता कामगारांना अनेक शासकीय योजनांचा लाभ मिळत आहेत.या कामगार असोसिएशनला आमची नेहमीच सहकार्य राहील. सचिन मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल कोल्हापूरचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. विकास बामणे यांनी कामगारांना हृदयआरोग्या विषयी घ्यावयाची काळजी याबद्दल मार्गदर्शन केले.

यावेळी प्रा. सम्राट शिंदे,डॉ,कृष्णा जाधव,डॉ. तानाजी हवलदार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाची स्वागत व प्रास्ताविक कामगार असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष मारुती रोकडे यांनी केले.सूत्रसंचलन वृषाली पवार यांनी केले. यावेळी डॉ. नितीन जाधव,सुभाष इंगवले, के.एन.कुंभार, प्रतापराव पाटील,संदीप मदने,सुनील तांदळे,शालन मोहिरे,मंगल पाटील,पूनम रोकडे,अमर पाटील,बसवेश्वर शेटे,माजी नगराध्यक्षा सुनंदा सोनटक्के,वाकूर्डे खुर्द महिला सरपंच शीतल पाटील,करमाळे सरपंच सचिन पाटील,प्रज्ञा चरणकर,अशोक सावंत,शिवाजी कदम,रवी यादव,अमोल साठे,पूजा साठे,राकेश कांबळे,अवधूत गुरव,राजू कांबळे,मनीषा पाटील,कृष्णा पवार,विद्या कांबळे,सादिक पिरजादे,पार्थ कांबळे,सदानंद टिळे,आबाजी मुजावर,नितीन गायकवाड,गोरख कांबळे,प्रल्हाद जाधव, उपस्थित होते.आभार पंकज खोत यांनी मानले.

# श्री संतकृपा इंटरनॅशनल ज्युनिअर कॉलेजचा १००% निकाल

## यशाची उज्वल परंपरा यंदाही कायम

घोगाव : घोगाव तालुका कराड येथील श्री संतकृपा शिक्षण संस्था संचलित श्री संतकृपा इंटरनॅशनल ज्युनिअर कॉलेज, येथील बारावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी यंदा फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परीक्षेत उत्तुंग यश मिळवत १००% निकाल मिळवला आहे. संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतीला आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीला याचे श्रेय दिले जात आहे.



यंदाच्या निकालात विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली असून, कु. निकिता राजाराम पाटील हिने ७८.८३% गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यानंतर जाधव विजय उदय याने ७२.००% गुणांसह द्वितीय, दुर्गवले विनया विश्वनाथ हिने ७१.५०% गुणांसह तृतीय क्रमांक, पाटील श्वेता सतीश हिने ७१.३३% गुणांसह चतुर्थ क्रमांक, तर पाटील ज्योती प्रताप हिने ७०.८३% गुणांसह पंचम क्रमांक मिळवला आहे. याशिवाय, पाटील मनश्री शंकर (७०.५०%) आणि साळुंखे वैष्णवी रवींद्र (७०.००%) ह्यांचाही निकाल अत्यंत समाधानकारक आहे. यंदा एकूण परीक्षार्थी पैकी ४०% विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय ठरते. या घवघवीत यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा डॉ. उषा जोहरी, सेक्रेटरी प्रसून जोहरी, खजिनदार प्राजक्ता जोहरी, सर्व संचालक मंडळ व प्राचार्या सौ. पुष्पा पाटील यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देतानाच त्यांच्या यशामागे असलेल्या शिक्षकांचे, पालकांचे आणि संस्थेच्या सहकाऱ्यांचे योगदानही कौतुकास्पद असल्याचे नमूद केले.महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक वर्गाकडून विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात येत असून, हे यश श्री संतकृपा इंटरनॅशनल ज्युनिअर कॉलेजच्या गुणवत्तेची साक्ष देणारे ठरले आहे.

> विद्यार्थ्यांचा १००% निकाल ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. हे यश विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या पाठिंब्यामुळेच शक्य झाले. सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मनः पूर्वक शुभेच्छा!
>
> **– प्राचार्या पुष्पा पाटील**

# समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची प्रचंड गर्दी



रायगड (याकूब सय्यद) : सध्या शालेय विद्यार्थ्यांना मे महिन्याच्या सुट्ट्या असल्याने तसेच गर्मीची उष्णता वाढल्याने मुंबई पुणे ठाणे सारख्याशहरी भागातील पर्यटक मोठ्या संख्येने रायगड जिल्हा अलिबाग मुरुड श्रीवर्धन रत्नागिरी हरे हरेश्वर श्रीवर्धन अशा अरबी समुद्र या ठिकाणी थंडगार हवा तसेच समुद्राच्या पाण्याचे थंडगार लाटा अंगावर घेण्यासाठी मौजमजा करण्याकरिता आले आहेत. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रायगड जिल्ह्याचा केंद्र असलेला अलिबाग समुद्रकिनारी पर्यटक प्रचंड प्रमाणामध्ये पर्यटक मोठ्या संख्येने समुद्रकिनाऱ्याचे थंडगार हवा व समुद्राच्या उसळत्या लाटा अंगावर घेण्यासाठी हौस मौज मजा करण्यासाठी आलेले आहेत मोठे मोठ्या हॉटेल लॉजिंग तसेच फार्म हाऊस या ठिकाणी आपल्या परिवारा सहित भाडेतत्त्वावर रूम घेतली आहेत त्यामुळे संपूर्ण अलिबाग समुद्रकिनारा हा पर्यटकांच्या गर्दीने भरला आहे . मे महिन्याच्या सुट्टीचा आनंद घेण्याकरिता अलिबाग शहरांमध्ये आलेले पर्यटकांमुळे अलिबाग येथील व्यवसायिकांमध्ये धंद्यामुळे तेजी आली आहे.

# सौरऊर्जा क्षेत्रात रोजगार निर्मितीची संधी : संजय देशमुख

शिराळा : सागाव ग्रामपंचायतीकडून केलेल्या सर्वेक्षणामध्ये ६५० नागरिकांनी सौर ऊर्जा प्रकल्प राबवणे बाबत नोंदणी केली होती.त्याच्या कार्यशाळेत ते बोलत होते.नागरिकांच्या अपेक्षापूर्तीसाठी झटणारी सागाव ग्रामपंचायत ही आदर्श ग्रामपंचायत आहे. मागेल त्याला सौर ऊर्जा प्रकल्प हे शासनाचे उद्दिष्ट असले तरी;या क्षेत्रामध्ये मागेल त्याला काम देखील उपलब्ध असलेने यामध्ये रोजगाराची प्रचंड संधी आहे.

त्यासाठी शिक्षणाची अट नाही.परंतु ग्रामीण भागात एखाद्या मुलाने नोकरी पत्करली की,त्याचे मित्र तुला नोकरीच्या ठिकाणी सोडू का?असे कधी विचारत नाहीत;उलट कशाला तिथे जातोस म्हणून त्याचे खच्चीकरण करतात.युवक वर्गाला जबाबदारी नको असली तरी, शेकडोणी मुला मुलींचे उज्वल भवितव्य आपल्या हातून होत



असल्याचा आपणास मनस्वी आनंद आहे. प्रचंड प्रमाणात रोजगार निर्मितीचे यासारखे दुसरे प्रभावी क्षेत्र नाही.शेतकरी कुटुंबात एकाने तरी नोकरी किंवा व्यवसाय केला पाहिजे.आपणाकडे आलेल्यांचे उज्वल भवितव्य झाल्याची अनेक मुला मुलींची उदाहरणे देऊन त्यांनी उपस्थितांची मने जिंकली.छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पासाठी तीस हजार रुपयांपासून अष्टयात्तर हजार रुपये पर्यंत अनुदान मिळते.जादा उत्पादित होणारी वीज महावितरण कडून विकत घेतली जाते. एकदा प्रकल्प बसवला की २५ वर्षे वीज देयकाची कटकट नाही. सातत्याने होत असलेल्या वीज दरवाढीतूनतर तुमची कायमची सुटका!.आता तर नवीन वीज जोडणी बंद आहे. शेतीपंपासाठी नव्वद टक्के अनुदान मिळते.आठवड्यातून सातही दिवस आणि ते ही दिवसा शेताला पाणी देता येते,रात्री अप रात्री जागून अथवा धोका पत्करून पाणी पाजण्याची गरज नाही.रिमोट द्वारे किती पाणी प्रवाह चालू आहे किती शिल्लक आहे याची इत्यंभूत माहिती मिळते.जास्त खोलीच्या विहिरी,नदीवर जास्तीत जास्त पाणी उपसा करणारे आधुनिक तंत्रज्ञानाचे ऊर्जा पंप मिळतात. त्याचा लाभ घ्यावा.असे सांगून श्री देशमुख यांनी याकरिता लागणाऱ्या कागदपत्रापासून ते प्रकल्प पूर्ण होईपर्यंतचे सखोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेबाबत माहिती मिळाल्यामुळे सागावखेरीज इतर गावातील इच्छुक नागरिकांनी गर्दी केली होती.सरपंच सौ.अस्मिता पाटील यांनी उद्योजक श्री देशमुख यांचे तर निवृत्त प्राचार्य श्री रामचंद्र माने यांनी श्री प्रकाश लोखंडे रा.सोनवडे यांचे हार पुष्प देऊन स्वागत केले. श्रीमती संजीवनी पाटील,सुनिता आढाव,शारदा घोलप,श्री मोहन पाटील,श्री संजय शेटे,श्री सुभाष पाटील,श्री बाबासो पाटील,श्री बाळासाहेब भोसले, श्री कृष्णात पाटील,श्री नामदेव नांगरे,श्री गुलाबराव देशमुख,श्री रघुनाथ चौगुले यांचे बरोबरच अनेक प्रतिष्ठित व नागरिक यावेळी उपस्थित होते.

# पुर्नवैभव प्राप्त व्हावे

जहाँ डाल-डाल पर सोने की चिडिया करती है बसेरा... असा अभिमानाने उल्लेख केला जात असे, पण आज भारताची अवस्था पाहता हा देश कुठे हरवला असा प्रश्न पडतो. श्रींच्या इच्छेने छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली होती. आज भारत पुन्हा 'सोने की चिडिया' व्हायचा असेल तर धर्माधिष्ठित राज्य आवश्यक आहे.

देशात सध्या भ्रष्टाचार, आतंकवाद, धर्मांतरण, गोहत्या, लव्ह जिहाद यामुळे स्थिती गंभीर झाली आहे. यावर उपाय म्हणून राज्यकर्ते व जनतेने साधना व धर्माचरण करणे अत्यंत आवश्यक आहे. गेली पंचवीस वर्षे सनातन संस्था साधना व धर्माचरणाचे महत्त्व सांगत आहे. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रम्ह डॉ. जयंत आठवले यांच्या ८३ व्या जन्मोत्सवानिमित्त गोव्यात फोंडा येथे 'शंखनाद महोत्सवा'चे आयोजन केले असून, या महोत्सवात धर्माधिष्ठित राज्याच्या दृष्टीने आवश्यक सूत्रांवर विचार विनिमय करण्यात येणार आहे. भारताला पुर्नवैभव प्राप्त होणे आवश्यक आहे.

**– सुरेश पंडीत, सातारा**

# बदाम हे पोषणाचा सोपा आणि विश्वासार्ह स्रोत : सोहा अली खान

पुणे : सोहा अली खान म्हणाल्या,जेव्हा मी घरी जेवण बनविण्याची तयारी करते, तेव्हा प्रोटीनला सर्वात वरचे स्थान असते. विशेषतः माझी मुलगी वाढत्या वयाची आणि खूप ॲक्टिव्ह असल्याने. बदाम हे आमच्यासाठी पोषणाचा सोपा आणि विश्वासार्ह स्रोत ठरले आहेत. शूट्सदरम्यान देखील मला बदाम खायला आवडतात. ते मला पचायला जड न वाटता एनर्जी देतात. मी माझ्या मुलीच्या आहारात, तिच्या नाश्त्यात किंवा सॅलडमध्ये देखील बदाम घालते. हा एक छोटा पण अर्थपूर्ण बदल आहे ज्यामुळे आपण दररोज पुरेशे प्रोटीन मिळवतो.असे वक्तव्य अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्नियाने पुण्यात अड्रेसिंग इंडियाज प्रोटीन गॅप : बेटर नुट्रीशन फॉर हेल्दीयर टुमारो' या विषयावर आयोजित चर्चासत्रात अभिनेत्री सोहा अली खान ने केले.

हा कार्यक्रमपुण्यातील रॅमी ग्रँड हॉटेल अँड स्पायेथे झाला आणि यामध्येअभिनेत्री सोहा अली खान, फिटनेस एक्स्पर्ट यास्मिन कराचीवाला आणि रितिका समद्दार (रीजनल हेड - डायेटेटिक्स, मॅक्स हेल्थकेअर, नवी दिल्ली)यांसारख्या प्रसिद्ध व्यक्तींनी सहभाग घेतला होता. पॅनेलने भारतीय नागरिकांच्या पोषणातील प्रोटीन गॅपच्या(प्रथिनांची कमतरता) समस्येवर प्रकाश टाकला. आहारमधील छोटे छोटे बदल किती मोठी भूमिका निभावतात- रोज आहारात मूठभर बदाम खाण्याने सर्व वयोगटांतील लोकांसाठी प्रोटीन लेव्हल सुधारण्यात कशी मदत




होऊ शकते हे त्यांनी अधोरेखित केले. सर्वांगीण वाढीस, आरोग्यास आणि ताकद वाढविण्यासाठी प्रोटीन अत्यावश्यक घटक आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी, तरुणांना ऊर्जा मिळवण्यासाठी आणि प्रौढांना स्नायूंची दुरुस्ती व संपूर्ण आरोग्यासाठी प्रोटीनची गरज असते. तरीही भारतीय आहार या बाबतीत कमी पडतो.

उदाहरणार्थ, एका बाऊल डाळीमध्ये सुमारे १८ ग्रॅम प्रोटीन असते, जे सक्रिय जीवनशैली असलेल्या किंवा जास्त पोषणाची गरज असलेल्या घरातील लोकांसाठी पुरेसे नसते.पॅनेलिस्ट्सनी असे सांगितले की संपूर्ण आहार बदलण्याची गरज नाही. फक्त आहारातील छोटे छोटे बदल - जसे की जेवणामध्ये किंवा नाश्त्यांमध्ये बदामांचे सेवन करणे परिणामकारक ठरू शकते.बदाम हे नैसर्गिक, प्लांट-बेस्ड प्रोटीन सोर्स आहेत, आणि ३० ग्रॅम सर्व्हिंगमध्ये सुमारे ६ ग्रॅम प्रथिनेमिळतात. त्यासोबतच बदामांमध्येमॅग्नेशियम, व्हिटॅमिन ई आणि झिंकसारखी प्रतिकारशक्ती व आरोग्यासाठी आवश्यक पोषकतत्त्वेहीअसतात.

यास्मिन कराचीवाला म्हणाल्या,एक फिटनेस प्रोफेशनल म्हणून, मी नेहमी लोकांना एनर्जी, रिकव्हरी आणि स्ट्रेंथसाठी प्रोटीनचे असलेले महत्त्व सांगते. बदाम हे माझे नेहमीचे पर्याय आहेत कारण ते चांगल्या दर्जाचे प्लांट-बेस्ड प्रोटीन देतात, जे व्यायामानंतर/पोस्ट वर्कआऊट खूप उपयोगी पडतात. ते तुम्हाला तृप्त ठेवतात, त्यामुळे ते स्मार्ट स्नॅक चॉईस ठरतात. मी बदाम नेहमी बरोबर ठेवते, मग मी क्लायंट्सना ट्रेनिंग देत असेल किंवा शूटला जात असेल. बदाम शरीराला योग्य पोषण देण्याचा एक सोपा मार्ग आहे.

# शिराळा पंचायत समिती यशवंत पंचायतराज अभियानात राज्यात तृतीय

## पुणे विभागात प्रथम क्रमांक






शिराळा : महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'यशवंत पंचायतराज अभियान २०२३-२४' अंतर्गत शिराळा पंचायत समितीने दोन सन्मान प्राप्त करून जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

शिराळा पंचायत समितीने राज्यस्तरीय तृतीय क्रमांक पटकावून १५ लाख रुपयांचे पारितोषिक, तसेच पुणे विभागात प्रथम क्रमांक मिळवून ११ लाख रुपयांचे पारितोषिक मिळवले असून, एकूण २६ लाख रुपयांची बक्षिसे शिराळा तालुक्याच्या वाट्याला आली आहेत. ही अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी कामगिरी आहे.

यशामध्ये जिल्हा परिषद सांगलीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम. तृप्ती धोडमिसे मॅडम यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, परिणामकारक मार्गदर्शन आणि तंत्राधिष्ठित नियोजन अत्यंत महत्त्वाचे ठरले. त्यांच्या प्रेरणेमुळेच शिराळा पंचायत समितीने ही उल्लेखनीय झेप घेतली.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. निखिल ओसवाल, प्रकल्प संचालक सौ. नंदिनी घाणेकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे व शशिकांत शिंदे तसेच गटविकास अधिकारी प्रकाश पोळ, तत्कालीन गट विकास अधिकारी संतोष राऊत, सहायक गटविकास अधिकारी अजिंक्य कुंभार यांच्या नियोजनबद्ध कार्यपद्धती, समन्वय आणि तालुका पातळीवरील अधिकारी कर्मचाऱ्यांचे एकत्रित प्रयत्न यामुळे ही यशस्वी अंमलबजावणी शक्य झाली.

या यशाबद्दल खा. धैर्यशील माने, आ. सत्यजित देशमुख, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन मानसिंगराव नाईक, माजी मंत्री शिवाजीराव नाईक तसेच उपविभागीय अधिकारी मा. श्रीनिवास अर्जुन, तहसीलदार शामला खोत पाटील यांनी शिराळा पंचायत समितीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

> तालुक्याच्या ग्रामीण भागात शाश्वत विकास, पारदर्शक प्रशासन, जनसहभाग, डिजिटल गाव, स्वच्छता, पाणी व्यवस्थापन, शिक्षण, आरोग्य यासारख्या विविध घटकांवर प्रभावी अंमलबजावणी करून शिराळा पंचायत समितीने 'यशवंत पंचायत' म्हणून ओळख राज्यपातळीवर निर्माण केले. यशामध्ये पंचायत समितीतील सर्व विभागप्रमुख, विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांचे मोलाचे योगदान असून, हे यश प्रत्येकाच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे.
>
> – **प्रकाश पोळ,** गट विकास अधिकारी

# महाराष्ट्रातून हिंदी विद्यापीठाचे दोन विद्यार्थी करतील प्रतिनिधित्व




नवी दिल्ली : केंद्र सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयाच्या सचिवालयाअंतर्गत पार्लियामेंटरी रिसर्च एण्ड ट्रेनिंग इंस्टीट्यूट फॉर डेमोक्रेसीज च्यावतीने स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये राज्यातून महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये बी. एड. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी देवब्रत दुबे व राज्यशास्त्र विभागाची एम.ए. द्वितीय वर्षाची विद्यार्थी प्रगती तेलंग या विद्यार्थ्यांची नावे आहेत.

पदवीधर, पदव्युत्तर आणि पीएच.डी. विद्यार्थ्यांसाठी एक वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये दोन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यानंतर दि. १ मे रोजी राष्ट्रीय स्तरावर ऑनलाइन बहुपर्यायी प्रश्नाधारित परीक्षा आयोजित करण्यात आली होती. यापैकी विश्वविद्यालयातील दोन विद्यार्थी देवब्रत दुबे आणि प्रगती तेलंग निवडले गेले. हे दोन विद्यार्थी संसद भवनात आयोजित कार्यक्रमात रवींद्रनाथ ठाकूर यांचे जीवन आणि तत्त्वज्ञान या विषयावर आपले मत मांडतील. या प्रसंगी लोकसभेचे अध्यक्ष तसेच केंद्रीय मंत्रिमंडळातील इतर मंत्री उपस्थित असतील. या स्पर्धेचे आयोजन राष्ट्रीय युवक संसद स्पर्धेचे संयोजक आणि इतिहास विभागाचे प्रभारी डॉ. बालाजी चिरडे यांनी केले. निवडल्या गेलेल्या विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल त्यांना विश्वविद्यालयाच्या कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा, कुलसचिव प्रो. आनन्द पाटील, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता प्रो. अवधेश कुमार व इतर शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

# सचिन तालेवार महावितरणच्या संचालक पदी रूजू



मुंबई : महावितरण कंपनीचे संचालक (प्रकल्प) म्हणून श्री. सचिन तालेवार यांनी कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते इंदूर येथील मध्यप्रदेश पश्चिम क्षेत्र विद्युत वितरण कंपनीचे संचालक (तांत्रिक) म्हणून कार्यरत होते. श्री. तालेवार गेल्या २८ वर्षांपासून महावितरणमध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत.

नवनियुक्त संचालक (प्रकल्प) श्री. सचिन तालेवार मूळचे नागपूर जिल्ह्याचे असून त्यांचे शालेय शिक्षण छिंदवाडा (मध्यप्रदेश) येथे झाले आहे. विद्युत अभियांत्रिकी पदवी संपादन केल्यानंतर श्री. तालेवार १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून चंद्रपूर येथे रूजू झाले. पदोन्नतीने सहायक अभियंता म्हणून कार्यरत असताना सन २००६ मध्ये सरळ सेवा भरतीद्वारे त्यांची कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली. या पदावर त्यांनी वर्धा, नागपूर व जालना येथे काम केले आहे. दरम्यान महावितरणकडून त्यांची गूडगाव येथील मॅनेजमेंट डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूटमधील (एमडीआय) एनर्जी मॅनेजमेंटच्या पोस्ट ग्रॅज्यूएशन डिप्लोमा इन बिझीनेस मॅनेजमेंट (पीजीडीएम) अभ्यासक्रमासाठी निवड झाली होती. सन २००७-०८ मध्ये हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

सन २०१६ मध्ये झालेल्या सरळसेवा भरतीमध्ये श्री. सचिन तालेवार यांची अधीक्षक अभियंता म्हणून निवड झाली. या पदावर लातूर येथे काम केले. तर सन २०१८ मध्ये सरळसेवा भरतीद्वारे त्यांची मुख्य अभियंता म्हणून निवड झाली. पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून त्यांनी जून २०१८ ते डिसेंबर २०२२ पर्यंत काम केले. बदलीद्वारे छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत असताना मे २०२३ मध्ये श्री. तालेवार यांची इंदूर येथील मध्यप्रदेश पश्चिम क्षेत्र विद्युत वितरण कंपनीचे संचालक (तांत्रिक) म्हणून निवड झाली. या कंपनीत ते दोन वर्षांपासून कार्यरत होते. त्यानंतर महावितरणचे संचालक (प्रकल्प) म्हणून नुकत्याच झालेल्या थेट भरती प्रक्रियेत त्यांची निवड झाली आहे.

'महावितरणच्या ग्राहकांना आणखी दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी सुधारित वितरण क्षेत्र योजनेसह (आरडीएसएस) विविध योजनांमधून पायाभूत वीजयंत्रणेच्या विस्तारीकरण व सक्षमीकरणाची कामे सुरू आहेत. या कामांसोबतच प्रामुख्याने सौर ऊर्जा प्रकल्पांच्या सर्व योजनांना आणखी गती देत कामे लवकर पूर्ण करण्यात येईल', असे महावितरणचे संचालक (प्रकल्प) श्री. सचिन तालेवार यांनी सांगितले.

# वसंत सायन्स अकॅडमीचा बारावीचा निकाल १०० टक्के

शिराळा : स्वामी विवेकानंद सेवाश्रम संस्था शिराळा संचलित वसंत सायन्स अकॅडमीच्या पहिल्याच बॅचचा निकाल १०० टक्के लागला आहे.

पृथ्वीसिंग नाईक यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गरज ओळखून विद्यार्थ्यांना जेईई, नीट व सीईटी परीक्षेचे मार्गदर्शन मिळावे यासाठी मागील वर्षी १ एप्रिला वसंत सायन्स अकॅडमी ची सुरवात शिराळा याठिकाणी केली. पहिल्याच वर्षी ग्रामीण भागातून ५० विद्यार्थ्यांनी या अकॅडमी मध्ये प्रवेश घेतला. हे सर्व ५० विद्यार्थी बोर्ड परीक्षेमध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले.

वसंत सायन्स अकॅडमीमध्ये विद्यार्थ्यांनी परिपूर्ण मार्गदर्शन करण्यासाठी खखढ मध्ये शिकलेल्या तज्ञ व अनुभवी प्राध्यापकाची नियुक्ती केली आहे. त्यामुळे जेईई, नीट व सीईटी या परीक्षेचे अतिशय उत्कृष्टरित्या शिक्षण दिले जाते.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष ड. भगतसिंग नाईक, सचिव विश्वप्रतापसिंग नाईक, उपाध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक, प्राचार्य डॉ. बनसोडे सर उपप्राचार्य प्रा राजसिंह पाटील, प्रा.भीमराव दशवंत मुख्याध्यापक श्रीधर यादव, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले. तसेच १० वी मध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना आव्हान करण्यात येते की अकॅडमी प्रवेशासाठी श्रीमती नम्रता शिंदे यांच्याशी संपर्क साधावा.

# छत्रपती शिवाजी ....

(पान ३ वरून) शिवाजी महाराज यांच्याबद्दलची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचवावी यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संग्रहालय उभारण्यात येत असल्याची माहिती श्री कात्तीकर यांनी यावेळी दिली. हे संग्रहालय छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने तयार करण्यात आलेले आहे. पाच मजली इमारतीच्या तळ मजल्यात हे संग्रहालय असणार आहे. या संग्रहालयातील वस्तू या ऐतिहासिक दस्ताऐवजांच्या सहाय्याने तयार करण्यात आलेल्या आहेत. संग्राहालय पाहताना महाराजाच्या काळात आपण आहोत असा आभास निर्माण करण्यात आलेला आहे.

# मागास गडचिरोली लवकरच समृद्ध जिल्हा होईलः राज्यपाल राधाकृष्णन

## आगामी पाच वर्षामध्ये गडचिरोली देशातील 'स्टील हब' होईलः मुख्यमंत्री

मुंबई : युवकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण व कौशल्य प्रदान केल्याशिवाय विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करता येणार नाही असे सांगून गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाने तेथील लॉइड स्टील कंपनी व पश्चिम ऑस्ट्रेलियाच्या कर्टीन विद्यापीठासोबत केलेल्या करारामुळे विद्यापीठामधील शिक्षणाचा दर्जा उंचावून आगामी काळात गडचिरोली जिल्हा सर्वाधिक समृद्ध जिल्हा म्हणून उदयास येईल व जिल्ह्याचा चेहरामोहरा पालटेल, असे प्रतिपादन राज्यपाल तथा कुलपती सी पी राधाकृष्णन यांनी येथे केले.

राज्यपाल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत गोंडवाना विद्यापीठाचे लॉइड्स मेटल्स व एनर्जी तसेच पश्चिम ऑस्ट्रेलियातील कर्टीन विद्यापीठ यांचेसोबत झालेल्या सामंजस्य करारांचे राजभवन मुंबई येथे हस्तांतरण करण्यात आले, त्यावेळी राज्यपाल बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वामुळे गडचिरोली तसेच इतर नक्षल प्रभावित भागातील नक्षलवाद पूर्णपणे आटोक्यात आला. त्याच्या फलस्वरूप गडचिरोली येथे विकासाची पहाट होत आहे असे सांगून कोणताही विकास सर्वसमावेशक असल्याशिवाय अपूर्ण असल्याचे राज्यपालांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नक्षलवादाचा पूर्णपणे बिमोड करण्यासाठी यापुढे देखील कठोर पावले उचलतील असा विश्वास राज्यपालांनी यावेळी व्यक्त केला. काही महिन्यांपूर्वी आपण माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचेसह गडचिरोलीचा दौरा केला होता असे सांगून गोंडवाना विद्यापीठाने स्थानिक गरज विचारात घेऊन अभ्यासक्रम आखावे तसेच विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळतील हे पाहावे असे राज्यपालांनी सांगितले. गडचिरोली येथे विपुल खनिज संपदा असून तेथे उत्तम प्रतीचे लोहखनिज आहे. त्याठिकाणी आज धातू व खनिजाच्या शोधन व विनियोगासाठी तज्ज्ञ लोकांची आवश्यकता आहे असे सांगून कर्टीन विद्यापीठाशी सहकार्यामुळे खनिज क्षेत्रातील शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल असे राज्यपालांनी सांगितले. गोंडवाना विद्यापीठाने लॉईड्स स्टील व एनर्जीच्या सहकार्याने विद्यापीठ तंत्रज्ञान संस्था स्थापन केल्याबद्दल राज्यपालांनी विद्यापीठाचे अभिनंदन केले.



**गडचिरोली देशातील 'स्टील हब' होईल: मुख्यमंत्री**

खनिज व धातू क्षेत्रातील उद्योग स्थापन झाल्यामुळे आगामी पाच वर्षांमध्ये गडचिरोली जिल्हा देशातील स्टील निर्मितीचे मोठे केंद्र होईल व जिल्ह्याचे मागासलेपण इतिहासजमा होईल असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले. खनिज व धातुशास्त्र या विषयांकरिता जगात दुसऱ्या क्रमांकाचे विद्यापीठ असलेल्या कर्टीन विद्यापीठाशी सहकार्य करार केल्यामुळे आजचा दिवस गोंडवाना विद्यापीठाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिल्या जाईल असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी बोलताना फडणवीस यांनी ऑस्ट्रेलियासोबत सामंजस्य करार करण्याची एकाच आठवड्यात ही दुसरी वेळ आहे असे सांगून मुंबईत झालेल्या 'वेव्हज' शिखर परिषदेच्या वेळी पश्चिम ऑस्ट्रेलिया येथील विद्यापीठासोबत नवी मुंबई येथे कॅम्पस स्थापन करण्याबाबत करार झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. गडचिरोली येथील विद्यापीठाचा लॉइड्स स्टील तसेच कर्टीन विद्यापीठासोबत तंत्रज्ञान शिक्षण संस्था स्थापन करण्याबाबत करार झाल्यामुळे राज्यातील उद्योगाला उत्तम दर्जाचे मानवसंसाधन मिळण्यास मदत होईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे ज्ञानाची कवाडे उघडली असून देशाबाहेरील विद्यापीठांना राज्यात कॅम्पस स्थापित करण्याचे दृष्टीने नवी मुंबई येथे 'एज्युसीटी' निर्माण करण्यात आली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. जगातील १२ नामवंत विद्यापीठांनी आपापले कॅम्पस एज्युसीटी नवी मुंबई ठिकाणी उघडण्यास मान्यता दिली असून यॉर्क, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया व इलिनॉईस विद्यापीठांनी अगोदरच तेथे कॅम्पस सुरु केले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. नवी मुंबई एज्युसीटी येथे सर्व प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे कॅम्पस स्थापन झाल्यावर त्याठिकाणी ८०,००० ते एक लाख विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण घेता येईल असे फडणवीस यांनी सांगितले.

लॉइड्स स्टीलचे व्यवस्थापकीय संचालक प्रभाकरन यांचे कौतुक करून त्यांनी धैर्य दाखविल्यामुळे गडचिरोली येथे एकात्मिक स्टील उद्योग सुरु करणे शक्य झाले असे फडणवीस यांनी सांगितले. स्थापनेपासून अवघ्या १२ - १३ वर्षात गोंडवाना विद्यापीठाने चांगली प्रगती केली असे सांगून विद्यापीठाने तंत्रज्ञान संस्था सुरु केल्यामुळे तसेच कर्टीन विद्यापीठाशी सहकार्य केल्यामुळे संस्थेतून देशात खनिज उद्योग तसेच धातुशास्त्र या विषयातील उत्तम तज्ज्ञ तयार होतील, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ऑस्ट्रेलियाचे मुंबईतील वाणिज्यदूत पॉल मर्फी, लॉईड्स स्टीलचे व्यवस्थापकीय संचालक बी प्रभाकरन व गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ प्रशांत बोकारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. गडचिरोली येथे युवकांना धातुशास्त्र, खाणकाम व कॉम्प्युटर सायन्स व अन्य विषयातील अभियांत्रिकी प्रशिक्षण देण्यासाठी स्वायत्त 'विद्यापीठ तंत्रज्ञान संस्था' स्थापन करण्याबाबत गोंडवाना विद्यापीठ व लॉइड्स मेटल्स यांचेमध्ये करार करण्यात आला. तर गोंडवाना विद्यापीठ व पश्चिम ऑस्ट्रेलियातील कर्टीन विद्यापीठ यांचेमध्ये उभयपक्षी पदवी (ट्विनिंग डिग्री) प्रदान करण्याबाबत करार करण्यात आला. माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार परिणय फुके, कर्टीन विद्यापीठाचे प्रकुलगुरु मार्क ऑग्डन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, तसेच विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते.